# रस्त्यावरुन जाणा-या नागरिकास लुटणा-या दोन चोरटयांना अटक

दि. १८/०३/२०१९ रोजी १२.१० वा चे सुमारास फिर्यादी युवक हे त्याचे काकाचे मोटारसायकलवरुन डी पी रोड, औंध या ठिकाणी घरी जात असताना डी ए व्ही स्कुल समोर एक अनोळखी मुलगा त्याचे गाडी समोर येवून त्यांना नाव विचारले. त्यावेळी त्याचे बाजूला कटटयावर बाजूला बसलेली आणखी ०२ मुले ही फिर्यादीच्या जवळ आले. त्यावेळी फिर्यादीच्या लक्षात आले की, ते काहीतरी गैरकृत्य करणार म्हणून त्यांनी त्याचे भावाला फिर्यादीने फोन करण्याकरता खिशातून फोन काढला असता, त्यावेळी एका इसमाने मोबाईल हिसकावून घेतला व फिर्यादीस हाताने मारहाण करुन लागले. फिर्यादी हे स्वतःचा जिव वाचवण्यासाठी पळत असताना एकाने पाठीमागून दगड मारुन जखमी केले व त्याचे मोटारीचे नुकसान केले बाबत चतुःश्रृंगी पो स्टे येथे गुरनं २६४/२०१९ भादवि क ३९२,३२३,४२७,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदरचा गुन्हा दाखल होताच युनिट -०४ पोलीस कर्मचारी गणेश काळे, दत्तात्रय फुलसुंदर यांनी घटनास्थळी भेट देवून व फिर्यादीची भेट घेवून गुन्हेगारांची माहिती घेतली. तसेच स्थानिक लोकांकडून माहिती प्राप्त करुन चौकशी केली. तेव्हा पोलीस कर्मचारी गणेश काळे, दत्तात्रय फुलसुंदर यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली असता, सदरचे कृत्य हे १) सलीम साहेबलाल शेख वय २० रा. गल्ली नं ५, राजीवगांधी झोपडपटटी, पिंपळे गुरव, सांगवी,पुणे २) अजय रमेश चव्हाण वय १९ रा गुरुव्दारा मागे औंध गाव व एक अनोळखी इसम यांनी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने पुढील कारवाई करता चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. तसेच यातील तिसरा अनोळखी इसम याचा शोध घेत आहोत.

सदरची कारवाई ही मा पोलीस उप आयुक्त श्री शिरीष सरदेशपांडे, सहा पोलीस आयुक्त श्री भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली सपोफौ शंकर पाटील, पो ना गणेश काळे, पो शि दत्तात्रय फुलसंदर, विशाल शिर्के,भालचंद्र बोरकर, रमेश साबळे, सचिन ढवळे यांनी केली आहे.

दि.२१/०३/२०१९

(अंजुम बागवान)<br>
पोलीस निरीक्षक<br>
युनिट ४,गुन्हे शाखा,पुणे शहर